दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | मंगळवार १ एप्रिल २०२५ | अंक ११० ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

चेहऱ्याच्या सुंदरतेपेक्षा मनाची सुंदरता पहावी.




# तुरुंगात वाल्मिक कराड, सुदर्शन घुलेला मारहाण?

## मनोज जरांगे पाटलांना वेगळाच संशय



**वाल्मीक कराड आणि सुदर्शन घुलेला जेलमध्ये मारहाण झाल्याची घटना समोर आली आहे. यावर आता मनोज जरांगे पाटील यांची पहिली प्रतिक्रिया समोर आली आहे.**

### नेमकं काय म्हणाले जरांगे पाटील?

**वाल्मीक कराड आणि सुदर्शन घुलेला जेलमध्ये मारहाण झाली असल्याची माहिती आहे. त्या संदर्भात आपल्याला काही माहिती नाही. ते आता जेल प्रशासनाला माहिती असेल. काय प्रकार झाला आहे, काय घडल आहे? ज्याबद्दल माहितीच नाही त्याबद्दल अधिकृत भूमिका आपण सांगणं बरोबर नाही, असं मनोज जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे.**



बीड जिल्ह्यातल्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचं अपहरण करून त्यांची हत्या करण्यात आली, या प्रकरणातील आरोपींना अटक करण्यात आली आहे. या प्रकरणात आरोपी असलेल्या वाल्मीक कराड आणि सुदर्शन घुलेला जेलमध्ये मारहाण झाल्याची घटना समोर आली आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणात वाल्मिक कराड आणि सुदर्शन घुले हे सध्या बीडच्या कारागृहात आहेत, तिथेच त्यांना मारहाण झाल्याची बातमी समोर येत आहे. वाल्मिक कराड आणि सुदर्शन घुले या दोघांना महादेव गिते आणि अक्षय आठवले यांनी मारहाण केल्याचे बोललं जात आहे. दरम्यान या प्रकरणात आता मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांची पहिली प्रतिक्रिया समोर आली आहे. पुढे बोलताना ते म्हणाले की, आज काय झालं की नाही झालं की अफवा उठवली, याबद्दल कल्पना नाही. हे आरोपी सोंग करणारे आहेत. जोपर्यंत अधिकृत माहिती बाहेर येत नाही तोपर्यंत बोलता येणार नाही. ते झालं की नाही झालं माहीत नाही पण ते सोंग असू शकतं. जेलमध्ये जर गँगवार झालं असेल, प्रक्रिया सुरू असेल तर ते एखाद्या वेळेस खरंही असू शकतं. तातडीने खटला चालून संतोष देशमुख यांच्या आरोपींना फाशी द्यावी, अशी मागणी यावेळी मनोज जरांगे पाटील यांनी केली आहे.

# वाल्मिक कराड आणि सुदर्शन घुले यांना कोणतीही मारहाण झालेली नाही, तुरुंग प्रशासन

संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणातील आरोपी वाल्मिक कराड आणि सुदर्शन घुले यांना तुरुंगात मारहाण झाल्याची बातमी समोर आली आहे. वाल्मिक कराड आणि सुदर्शन घुले हे सध्या बीडच्या कारागृहात आहेत, तिथेच त्यांना मारहाण झाल्याची बातमी समोर येत आहे. वाल्मिक कराड आणि सुदर्शन घुले यांना महादेव गिते आणि अक्षय आठवले यांनी मारहाण केल्याचं बोललं जात आहे. आता या प्रकरणात बीड जिह्ला कारागृहाकडून प्रेसनोट जारी करण्यात आली आहे. नेमकं काय म्हटलं? न्यायालयीन कोठडीत असलेले बंदी सुदिप



रावसाहेब सोनवणे व राजेश अशोक वाघमोडे हे दोघं त्यांना जिथे कारागृहात ठेवण्यात आलं आहे, तेथील मोकळ्या जागेत त्यांना देण्यात आलेल्या सुविधेनुसार ते आपल्या नातेवाईकांना फोन करण्यासाठी आले होते. याचदरम्यान एकमेकांकडे बघून त्या दोघांमध्ये शाब्दीक बाचाबाची झाली. त्यानंतर दोघांमध्ये झटापट देखील झाली. कर्तव्यावर असलेले पोलीस त्यांचा वाद सोडवत असतानाच तिथे इतर देखील काही कैदी जमा झाले. त्यामुळे गोंधळ वाढला, इतरही कैदी शिविगाळ करू लागले. त्यावेळी तिथे उपस्थित असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांनी परिस्थिती नियंत्रणात आणली व कैद्यांना पुन्हा आपआपल्या बरॅकमध्ये जाण्यास सांगण्यात आलं. या घटनेशी संबंधित आरोपींवर कायदेशीर कारवाई करण्याठी बीड पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. दरम्यान या घटनेनंतर वाल्मिक कराड आणि सुदर्शन घुले यांना मारहाण झाल्याची बातमी प्रसारमाध्यमांमध्ये सुरू आहे. मात्र वाल्मिक कराड आणि सुदर्शन घुले यांना कोणतीही मारहाण झालेली नाही, असं तुरुंग प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आल आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणात सीआयडीकडून आरोप पत्र दाखल करण्यात आलं आहे, सध्या या प्रकरणात सुनावणी सुरू आहे. वाल्मिक कराड हाच या प्रकरणातील मास्टरमाईंड असल्याचं आरोप पत्रात म्हटलं आहे. या प्रकरणात पोलिसांनी आरोपींना अटक केलं आहे, मात्र अजूनही एक आरोपी कृष्णा आंधळे हा फरार आहे. पोलिसांकडून त्याचा शोध सुरू आहे. मात्र अजूनही त्याला अटक करण्यात यश आलेलं नाहीये.

# डॉ.प्रशांत सानप म्हणजे आरोग्यसेवा तेवत ठेवणारा



बीड प्रतिनिधी - रुग्णसेवा हीच ईश्वर सेवा याचे ज्वलंत उदाहरण मध्ये डॉ. प्रशांत सानप, वंजारवाडी ता.शिरूर या छोट्याशा गावातून येऊन आपले वैद्यकीय शिक्षण पूर्ण करून, साईबाबा हॉस्पिटल च्या माध्यमातून डॉ.प्रशांत सानप यांची अविरत रुग्ण सेवा चालू आहे, सानप सर हे अस्थिरोग तज्ञ असून आत्तापर्यंत त्यांनी अनेक मोडलेल्या हाडांना जोडण्याचे काम केलेलं आहे, साईबाबा हॉस्पिटल च्या माध्यमातून गोरगरीब व गरजू रुग्णांच्या आतापर्यंत हजारो शस्त्रक्रिया अल्प दरात करून दिल्या आहेत, रुग्णाच्या मनातील आनंद हीच त्यांची आयुष्यभराची कमाई सांगून जातो. आलेल्या रुग्णांकडुन व त्यांच्या नात्यांकडून यांच्या वैद्यकीय सेवे बाबत सदैव कौतुक होत राहते..

**आपणास उदंड आयुष्याच्या अनंत शुभेच्छा डॉ.प्रशांत सानप साहेब - रुग्णसेवक शरद झोडगे ( ग्रा.पं. सदस्य तथा उपजिल्हाप्रमुख शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष, बाजीराव दादा चव्हाण मित्रपरिवार )**

# किशनराव जोगदंड यांचे निधन




नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : लोहा तालुक्यातील उमरा येथील ज्येष्ठ नागरिक कै.किशनराव नागोजी जोगदंड वय वर्षे ७३ यांचे वृद्धापकाळाने दि.३१-मार्च रोजी सकाळी १० वाजता निधन झाले असून त्यांच्या पार्थिवावर दि.१-एप्रिल रोजी सकाळी १० वाजता उमरा येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.कै.किशनराव नागोजी जोगदंड त्याच्या पश्चात पत्नी चार मुले दोन मुली नातू पणतू असा मोठा परिवार आहे. उमरा येथील चंद्रकांत जोगदंड,सूर्यकांत जोगदंड, प्रशांत जोगदंड,नागसेन जोगदंड यांचे ते वडील होत.तर ग्रामपंचायत सदस्य सुनिल सोनटक्के यांचे ते नातलग होत.



मुस्लिम धर्माचा पवित्र रमाझन महिना, रमजान ईद निमित्त ईदगाह मैदान येथे मुस्लिम समाज बांधवानी सामूहिक नमाज पठाण करून एकमेकांना ईद च्या शुभेच्छा दिल्या. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे ) पक्षाचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी उपस्थित राहुन सर्व मुस्लिम बांधवाना शुभेच्छा दिल्या. त्या वेळी त्यांच्या समवेत राजाभाऊ माहुवाले, संदीप उबाळे, रवी वाघमारे, दिलीप नाना पवार सह आदी शिवसैनिक पदाधीकारी उपस्थित होते.

# अजित पवार यांच्या निकटवर्तीयाच्या घरासमोर जादूटोणाचा प्रकार, नारळ, बाहुल्या, लिंबू अन काळा बुक्का



पुणे विद्याचे माहेरघर असलेले शहर म्हटले जाते. पुण्याला देशाची सांस्कृतिक राजधानी म्हटले जाते. या पुण्यात काळू जादूसारखा अघोरी प्रकार समोर आला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि अजित पवार यांचे निकटवर्तीय असलेल्या नेत्याच्या घरासमोर हा प्रकार झाला. पुण्याचे माजी महापौर असलेले दत्ता धनकवडे यांच्या बंगल्यासमोर काळी जादूटोणा करण्याचा धक्कादायक प्रकार उघड झाला आहे. पुण्यातील धनकवडी परिसरात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गटाचे नेते दत्ता धनकवडे राहतात. त्यांच्या बंगल्यासमोर काळी जादू करण्याचा धक्कादायक प्रकार २९ मार्च रोजी करण्यात आला. नारळ, दहीभात, उकडलेले अंडी, लिंबू, काळा बुक्का असे काळ्या जादूचे साहित्य त्यांच्या घरासमोर आढळून आले आहे. अघोरी विधी करणाऱ्या महिलेचे नाव धानका काकासाहेब चव्हाण असे आहे. चार महिन्यांपासून असा प्रकार आरोपी धानका ही गेल्या चार महिन्यांपासून अमावस्येच्या दिवशी धनकवडी परिसरात वेगवेगळ्या ठिकाणी अघोरी विधी करत आहे. वेगवेगळ्या व्यक्तींच्या घरासमोर नारळ, दहीभात, उकडलेले अंडी, लिंबू, काळा अगीर हे काळ्या जादूचे साहित्य ठेवून अघोरी विधी करत असल्याची माहिती समोर येत होती. २९ मार्च रोजी अमावस्येच्या दिवशी रात्री आठ वाजता धानका हिने राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि माजी महापौर दत्ता धनकवडे यांच्या बंगल्यासमोर हा प्रकार केला. नारळ भातुकलेल्या अंडी, लिंबू आदी आघोरी प्रकार ठेवून जादूटोणा करण्याचा धक्कादायक प्रकार केला आहे. थेट राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या एका बडा नेत्याच्या घरासमोर जादू टोण्याचा धक्कादायक प्रकार केला. हे प्रकरण उघडकीस आल्यामुळे शहरात खळबळ उडाली आहे. या प्रकरणाची माहिती स्थानिक लोकांना समजल्यावर त्या महिलेस पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले. या प्रकरणी पोलीस चौकशीतून काय माहिती समोर येते? त्या महिलेस हे कृत्य कोणी करायला लावले? या प्रश्नांची उत्तरे मिळण्याची शक्यता आहे.

## संपादकीय

### डळमळले म्यानमार!

म्यानमार, थायलंडमध्ये शुक्रवारी झालेल्या भीषण भूकंपात हजारो लोकांचे बळी गेले आहेत. म्यानमारमध्ये बळी गेलेल्यांची संख्या दीड हजाराहून अधिक तर जखमींची संख्या चार हजारहून अधिक आहे. भूकंपानंतर कोसळलेल्या इमारतींच्या ढिगा याखाली अनेक लोकांचा मृत्यू झाला असून, मृतदेह बाहेर काढण्याचे काम सुरू आहे. म्यानमार आणि थायलंडला शुक्रवारी दुपारी ७.७ रिश्टर स्केलचा जबरदस्त धक्का बसला. अनेक ठिकाणी इमारती जमीनदोस्त झाल्या. राजधानी नेपिर्तो येथे वीजपुरवठा, टेलिफोन, इंटरनेट सेवा ठप्प झाली. म्यानमारमधील लष्करी प्रशासनाने म्हटले आहे की, १६०० हून अधिक नागरिकांचा मृत्यू झाला असून ४ हजारहून अधिक नागरिक जखमी आहेत. भूकंपामुळे परिस्थिती अधिकच बिकट झाली आहे. सुमारे १० हजारहून अधिक लोकांचे बळी गेले असावेत अशी भीती व्यक्त केली जात आहे. म्यानमारमध्ये दीर्घ काळापासून नागरी संघर्ष सुरू असून, त्यामुळे येथे अनेक समस्या तयार झाल्या आहेत. थायलंडमध्ये भूकंपामुळे राजधानी बँकॉकला मोठा फटका बसला. येथे दोन हजारहून अधिक इमारती कोसळल्या आहेत. लोकांना ढिगा-याखालून बाहेर काढण्याचे काम सुरू आहे. म्यानमारमध्ये भूकंपाने मोठा विध्वंस केला असून या भूकंपाची तीव्रता ३३४ अणुस्फोटांच्या बरोबरीची होती. बँकॉकमध्ये चतुरक या ३० मजली निर्माणाधीन इमारतीच्या ढिगा-याखालून १० मृतदेह बाहेर काढण्यात आले. म्यानमार व थायलंड भूकंपपीडितांसाठी जगभरातून मदतीचा ओघ सुरू झाला आहे. भारताने ङ्गऑपरेशन ब्रह्मफ अंतर्गत १५ टन बचावसाहित्य म्यानमारला रवाना केले आहे. सी १३० विमानाने हे साहित्य पाठवण्यात आले असून यात तंबू, ब्लँकेट, ताडपत्री, सोलर दिवे, स्लीपिंग बॅग, जेवणाची तयार पाकिटे, जनरेटर, आवश्यक वैद्यकीय औषधे पाठवण्यात आली आहेत. बचाव कार्यात सहभागी होण्यासाठी एनडीआरएफचे ८० जणांचे एक पथकही पाठवण्यात आले आहे. अमेरिकेने दोन विमाने आणि १२७ जणांचे बचाव पथक पाठवले आहे. त्याबरोबरच ढिगा-याखालील व्यक्तींचा शोध घेणारी उपकरणे, ऊर्जानिर्मितीची विविध उपकरणे पाठवली आहेत.दक्षिण कोरियाने १६.५ कोटी रुपयांचे साहित्य पाठवले असून मलेशियाने मदतकार्यासाठी तज्ज्ञांची टीम पाठवली आहे. चीनने एकूण ११५ कोटी रुपयांची मदत पाठवली आहे. त्यांनी तंबू, ब्लँकेट, प्रथमोपचार साहित्य, भोजन, पिण्याचे पाणी व इतर जीवनावश्यक वस्तू पाठवल्या आहेत. जगावर संकट कोसळले की सारे जग कसे एकवटते याचे हे उदाहरण आहे. भूगर्भ शास्त्रज्ञांच्या म्हणण्यानुसार हा थायलंडमधील २०० वर्षांतील सर्वांत मोठा भूकंप आहे. भूकंपाचे धक्के इतके तीव्र होते की, केंद्रापासून शेकडो किमी दूर असलेल्या बँकॉकमधील इमारती नष्ट झाल्या. संयुक्त राष्ट्राने मदतीसाठी ४३ कोटी रुपये दिले आहेत. रशियाच्या आपत्कालीन खात्याने १२० बचाव कर्मचारी व मदतीचे सामान, दोन विमाने पाठवली आहेत. म्यानमारमधील अत्यावश्यक सामग्रीचा तुटवडा पाहता बचाव व मदतकार्य संथगतीने सुरू आहे. म्यानमारमध्ये भूकंपाची मालिकाच सुरू आहे. गत तीन दिवसांत तेथे ५ रिश्टर स्केलचे तीन भूकंप झाले आहेत. म्यानमारमधील मोठ्या भूकंपाने त्याचे परिणाम भारत, थायलंडसारख्या शेजारी देशांनाही जाणवले. या भूकंपाने लोकांना निसर्गाच्या सामर्थ्याची आणि कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीसाठी तयार राहण्याची गरज लक्षात आणून दिली. तीव्रतेच्या बाबतीत सर्वांत मोठा भूकंप १९६० मध्ये चिलीमध्ये झाला होता. रिश्टर स्केलवर त्याची तीव्रता ९.४ ते ९.६ होती. २२ मे १९६० रोजी दुपारी झालेला हा भूकंप इतका तीव्र होता की त्यातून निर्माण झालेल्या त्सुनामी लाटा चिली, हवाई, जपान, फिलीपीन्स, ऑस्ट्रेलिया आणि न्यूझिलंडपर्यंत पोहोचल्या. म्यानमारमधील सागांग फॉल्ट हा भूकंपप्रवण भाग आहे. २०१२ मध्ये येथे ६.८ रिश्टर स्केलचा भूकंप झाला होता. शुक्रवारचा भूकंप गत ७५ वर्षांतील सर्वांत मोठा होता, असे ङ्गरॉयटर्सफ्ने म्हटले आहे. हा भूकंप जमिनीपासून फक्त १० कि.मी. खोलवर होता. त्यामुळे झटके तीव्र होते आणि इमारतींना त्याची झळ बसली. भूकंपाचे हादरे अतिशय तीव्र होते आणि सुमारे चार मिनिटे ते जाणवले. थायलंडमधील ३० मजली इमारत पत्त्याच्या बंगल्यासारखी कोसळली. या इमारतीचे बांधकाम तीन वर्षांपासून सुरू होते. त्यात जवळपास ५.९ कोटी डॉलर्सची गुंतवणूक करण्यात आली होती. भूकंप म्हणजे जमिनीखालील हालचालींमुळे होणारे कंपन. जमिनीखालील दोन मोठे थर (ब्लॉक) अचानक एकमेकांवर आदळतात तेव्हा भूकंप होतो. यातून निर्माण होणारी ऊर्जा भूकंपीय लहरींच्या रूपात बाहेर पडते. या लहरी जमिनीत पसरतात आणि त्यामुळे जमीन हादरते. जमिनीचा बाहेरील थर (क्रस्ट) टेक्टोनिक प्लेटस्मध्ये विभागलेला आहे. या प्लेटस् सतत हळूहळू हलत असतात. त्या एकमेकाजवळ सरकतात किंवा टक्कर होते. त्यांचे किनारे खडबडीत असल्याने त्या अडकतात पण बाकी भाग थरथरत राहतो. जेव्हा या प्लेटस् खूप दूर सरकतात आणि किनारा मोकळा होतो, तेव्हा भूकंप होतो. जमिनीखाली भूकंप होणा-या जागेला ङ्गहायपोसेंटरफ म्हणतात, तर त्याच्या वरच्या जमिनीवरील ठिकाणाला ङ्गएपिसेंटरफ म्हणतात. भूगर्भातील हालचालींमुळे प्रचंड प्रमाणात ऊर्जेचे उत्सर्जन होते आणि त्यामुळे भूकंप तयार होऊन पृथ्वीच्या पृष्ठभागाची हालचाल होते. परिणामी जमीन थरथरणे, हलणे, जमिनीला भेगा पडणे, कंपन होणे अथवा भूकवच अचानक काही क्षण हादरणे यासारख्या घटना घडतात. भूकंप प्रामुख्याने पृथ्वीच्या कवचाच्या कोणत्याही भागामध्ये समतोल नसल्यामुळे होतो. पृथ्वीच्या आत वायूचा विस्तार व आकुंचन, मानवनिर्मित हायड्रोस्टॅटिक दाब, जलाशय, तलाव यासारखे जलस्रोत आणि प्लेटस्च्या हालचाली भूकंपाला कारणीभूत ठरतात. म्यानमारमधील विनाशकारी भूकंपाचे रहस्य तेथील भूगर्भात दडलेले आहे. भूकंपाचा केंद्रबिंदू मध्य म्यानमारमध्ये होता, जो मंडाले शहरापासून सुमारे १७.२ किलोमीटर अंतरावर आहे. त्यामुळे त्याचा फटका शेजारील देश थायलंडलाही बसला. भूकंपानंतर म्यानमार आणि थायलंडमध्ये राष्ट्रीय आणीबाणी घोषित करण्यात आली आहे. सध्या जगभरातील अनेक देश म्यानमारच्या मदतीसाठी पुढे येत आहेत. संकटकाळात एकमेकांना मदत करणे यातच मानवजातीचे कल्याण आहे.

# जाती-धर्मा पलीकडे जाऊन माणुसकी जपणारा माणुसकीचा झरा म्हणजेच अतुल शेलार



कोणताही व्यक्ती जाती धर्माच्या नावाने मोठा होत नाही तर तो त्याच्या कर्तुत्वाने मोठा होत असतो. कुसळंब येथील सामाजिक कार्यकर्ते अतुल शेलार हे पण एक असंच व्यक्तिमत्व आहे जे कुसळंब सह परिसरातील नागरिकांच्या अडीअडचणीला धावून जातात लोकांना मदत करतात आणि त्यातून लोकांचे आशीर्वाद मिळवतात हीच त्यांची पद्धत सर्वांना आपलंसं करत आहे. आज सामाजिक कार्यकर्ते अतुल शेलार यांचा वाढदिवस वाढदिवसानिमित्त त्यांना प्रथमता खूप खूप शुभेच्छा आणि त्यांच्या कार्यावर प्रकाश टाकण्याचा आम्ही केलेला प्रयत्न...

आई वडिलांचे संस्कार जेव्हा मुलावर चांगले होतात तेव्हाच मुलं चांगली घडतात. तो संस्काराचा भाग असतो. त्याचबरोबर आजूबाजूचे वातावरण विचाराची झालेली परिपक्वता महापुरुषांचा झालेला प्रभाव हे पण तितकेच महत्त्वाचे मुद्दे असतात. या सर्वांच्या सानिध्यातून कुसळंब गावामध्ये सामाजिक कार्यकर्ते अतुल शेलार यांच्या रूपाने माणुसकीचा झरा पाहायला मिळत आहे. क्षेत्र कोणतेही असो त्या ठिकाणी आपल्या हातून काही चांगलं होत असेल तर नक्कीच त्या ठिकाणी धावून जाणं आणि त्या व्यक्तीची मदत करणं ही अतुल अण्णाची ओळख आहे. कोणत्याही व्यक्तीला शिक्षण क्षेत्र असेल आरोग्य क्षेत्र असेल सामाजिक क्षेत्र असेल धार्मिक क्षेत्र असेल त्या ठिकाणी एखाद्या गोष्टीची कमतरता भासली की त्याच्या तोंडी नक्कीच अतुल अण्णा शेलार यांचे नाव येत हा व्यक्ती आपल्याला मदत करेल का बरं कारण की अतुल यांचे काम अतुलनीय आहे. जेव्हा सर्वसामान्य नागरिकांच्या मनात येत या व्यक्ती आपली मदत करू शकतो तेव्हा आपण समजून घ्यायचं की तो व्यक्ती विचाराने मनाने किती मोठा आहे. अतुल शेलार यांच्या विषयी लिहिताना शब्दही कमी पडतात कारण असं कोणतं क्षेत्र नाही की त्या ठिकाणी त्यांनी आपलं काम केलं नाही. काम करताना वेळ काळ कधी पाहिला नाही त्या व्यक्तीची आर्थिक परिस्थिती कधी पाहिली नाही तो व्यक्ती कोणत्या जाती धर्माचा आहे ते कधी पाहिला नाही तो अडचणीत आहे त्याची मदत आपण करू शकतो आणि आपल्या मदतीने त्याचं चांगलं होऊ शकतं हेच मनामध्ये ठेवून सामाजिक कार्यात स्वतःला झोकून देणारे अतुल अण्णा शेलार यांनी आपली वेगळीच ओळख निर्माण केली आहे म्हणूनच अशा व्यक्ती विषयी लिहिताना सुद्धा मला आनंद होतो कारण की लिहिणारा व्यक्ती आणि ज्याच्या विषयी लिहिणारा व्यक्ती हे विचार आणि परिपक्व असतात त्याचं लिहायचंय तो परिपक्व असल्याशिवाय त्याच्याविषयी लिहिताना आपल्यातील परिपक्वता सिद्ध होत नाही हे मला चांगलं माहिती आहे त्यामुळेच आज आमचे स्नेही सामाजिक कार्यकर्ते अतुल अण्णा शेलार यांचा वाढदिवस आहे आणि त्यांच्या कार्यावर उजाळा टाकण्याचं माझं कर्तव्य आहे नक्कीच त्यांच्या कार्यावर उजाळा टाकताना मी कमीही पडलो असेल परंतु त्यांचं कार्य किती मोठ आहे हे आपल्या सर्वांना माहितीच आहे. अजूनही त्यांच्याविषयी लिहीत राहील यात शंका नाही कारण की त्यांच्यावर नवनवीन जबाबदाऱ्या पडणार आहेत ते त्यांच्या जबाबदारीतून आपल्याला त्यांचं कर्तुत्व सिद्ध करून दाखवणार आहेत यातही मला शंका वाटत नाही कारण की ते विचाराने परिपक्व आहेत मग जेव्हा माणूस विचाराने परिपक्व होतो तेव्हा त्याला सर्व माणसाची मन कळतात आणि वळवताही येतात असं मला वाटतं अशाच व्यक्ती विषयी लिहिताना आनंद होत आहे पुन्हा एकदा अतुल अण्णा शेलार यांना वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा देतो आणि माझ्या लेखणीला विराम देतो...

**- प्रा.सचिन पवार**
**निर्भीड पत्रकार**

# अर्धमसला येथे खा.बजरंग सोनवणे यांची भेट; शांतता, सामाजिक सलोखा राखण्याचे आवाहन

## हिंदू-मुस्लिम बांधवांशी साधला संवाद







बीड: अर्धमसला (ता.गेवराई ) येथील मस्जिदमधे दि.३० मार्च रोजी पहाटे जिलेटीनचा स्फोट झाला. यानंतर पोलीस प्रशासनाने तातडीने दोन आरोपीना ताब्यात घेतले. दरम्यान, खा.बजरंग सोनवणे यांनी अर्धमसला येथे भेट देत मस्जिदची पाहणी केली. यावेळी ग्रामस्थांशी संवाद साधत शांतता व सलोखा राखण्याचे आवाहन केले. अर्धमसला गावात ईदच्या आदल्या दिवशी दोघांनी मिळून पवित्र मस्जिदमधे जिलेटिन कांड्याचा स्फोट केला. स्फोटात मस्जिदला तडे गेले आहेत. दरम्यान, ही घटना समजताच खा.बजरंग सोनवणे यांनी अंबाजोगाई तालुक्यातील नियोजित कार्यक्रम बाजूला सारून अर्धमसला गावात जाऊन मस्जिदची पाहणी करून हिंदू-मुस्लिम बांधवांशी संवाद साधला. यावेळी गावातील लोक प्रचंड समजदार आहेत, याठिकाणी दोन्ही धर्मातील लोकांमधे एकमेकांच्या मनात प्रचंड आदर दिसत आहे. जे कोणी आरोपी आहेत त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी यासाठी आपण पोलिस अधीक्षक यांना बोलनार आहोत. हिंदू-मुस्लिम बांधवांचे मोठे सण साजरे केले जात आहेत. हा उत्सव आनंदात साजरा करावा आणि सलोखा कायम ठेवावा, असे आवाहन केले. यावेळी मुस्लिम बांधवानी देखील गावात आम्ही कायम एकीने राहत आलो आहोत, आजही आणि उद्याही एकीने राहू, असा विश्वास व्यक्त केला. यावेळी माजी आमदार बदामराव पंडित, दत्तात्रय ठोंबरे, निझाम शेख, बाबुराव पोटभरे यांच्यासह ग्रामस्थांची उपस्थिती होती. यावेळी अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्याशी गावात चर्चा करून या स्फोटामागे काय उद्देश होता हे तपासा, अश्या सूचना केल्या.

'त्याच' मस्जिदमधे खा.सोनवनेंचा इफ्तार अर्धमसला गावात ज्या मस्जिदमधे स्फोट झाला, त्याच ठिकाणी खासदार बजरंग सोनवणे यांच्या उपस्थितीत हिंदू-मुस्लिम बांधवानी एकत्रीत येत इफ्तार केला. यावेळी माजी आमदार बदामराव पंडित, निजाम शेख, भागवत तावरे यांची उपस्थिती होती.

# बनावट कागद पत्रा आधारे एकोनिस लाख साठ हजार रुपये मावेजा उचलून अपहार केल्याच्या आरोपातून रामा धनवडे व अंसा बाई यांना जामीन मंजूर..ॲड योगेश टेकाडे

घटनेची हकीकत अशी की,मी बंकट पि. श्रीराम शिंदे, वय-३० वर्षे, धंदा-शेती, रा. कोळवाडी ता.जि.बीड यांनी फिर्याद दिली की,आमची मौजे पाली ता. जि.बीड येथे गट नं. ७४७ मौजे पाली ता.जि.बीड येथे जमीन आहे. सदर गटातुन ०.०६ आर जमीन शासनाने राष्ट्रीय महामार्ग क्र. २११ साठी संपादीत केली आहे, त्याचा मावेजा शासनाने रु.१९,६२,०००/ (एकोणीस लाख बासष्ठ हजार रुपये) मंजुर केला आहे. सदर पूर्ण गटाची मालकी माझी आजी आसराबाई भ्र. लिंबाजी शिंदे हिची आहे. आम्ही सर्वजण कोळवाडी येथे राहायला आहोत, असे असतांना संपादनाचे वेळी पाली ता. जि.बीड येथील रामा लक्ष्मण धनवडे यांच्या मनात या मावेजा बाबत लालच निर्माण झाल्यामुळे या पूर्ण गटाची मालकी आणि ताबा माझी आजी आसराबाई लिंबाजी शिंदे हिची असतांना रामा धनवडे यांनी या गटाचा ताबा आनसाबाई लक्ष्मण धनवडे हिचा आहे असे खोटे सांगुन मोजणी वेळी तिचे नावाचा ताबा दर्शवला.सदर या घटनेची माहिती आम्हाला या जमीनीचा आवॉर्ड मंजुर झाल्यानंतर सदर गटांतील संपादीत जमीनीचा मावेजा आनसाबाई लक्ष्मण धनवडे हिला देऊ नये म्हणुन तक्रारी अर्ज दिला, तेव्हा सदर भू संपादन कार्यालय बीड येथील कर्मचारी एम.जे.शेख यांनी सांगितले की तुम्ही तुमचा ताबा असल्याबाबत मोजणी करुन स्वतंत्र अहवाल सादर करा, त्यावरुन आम्ही दिनांक १२.१२.२०१६ रोजी अर्ज मोजणी कार्यालयात दिला. आमच्या अर्जानूसार आम्ही मोजणी कार्यालयाने दिनांक १०.०१.२०१७ रोजी मोजणी केली व आमच्या जमीनीचा तसा अहवाल दिली, त्यानुसार आम्ही सदर अहवाल आणि कागदपत्रे घेऊन सदर कार्यालयात गेलोत.या ०.०६ आर चा मावेजा रु. १९,६२,०००/- (एकोणीस लाख बासष्ठ हजार रुपये) आहे, याचा पूर्ण अधिकार फक्त माझी आजी आसराबाई लिंबाजी शिंदे ही असतांना सदर रामा लक्ष्मण धनवडे यांनी त्यांची आई आनसाबाई लक्ष्मणधनवडे हिच्या नावे आसराबाईची संमती नसतांना तिचे बनावट अंगठे करुन संमतीपत्रबनवुन आनसाबाईचे नावे रक्कम रु.१९,६०,०००/- (एकोणीस लाख साठ हजार रुपये) व रु.२,०००/- (दोन हजार रुपये) फक्त माझी आजी हिच्या नावे देण्यात यावे असे खोटे संमतीपत्र तयार करुन रामा लक्ष्मण धनवडे व भू संपादन कार्यालयातील क्लार्क एम.जे.शेख आणि वि.भु.सं. अधिकारी विकास माने यांनी संगणमत करुन खोट्या कागदपत्रा आधारे माझ्या आजीच्या नावाची रक्कम रु.१९,६२,०००/- (एकोणीस लाख बासष्ठ हजार रुपये) आनसाबाई लक्ष्मण धनवडे हिच्या नावे दिनांक ११.०५.२०१७ रोजी मावेजा वर्ग केला, या वेळी आम्ही वेळोवेळी मावेजाची मागणी करुनही सदर मावेजा रक्कम रु.१९,६०,०००/- (एकोणीस लाख साठ हजार रुपये) चा अपहार करुन आम्हाला वंचित ठेवले आहे. त्यामुळे आमच्या मावेजाचा अपहार करुन बनावट कागदपत्रा आधारे संगणमत करुन रामा लक्ष्मण धनवडे व आनसाबाई लक्ष्मण धनवडे दोघे रा. पाली ता. जि. बीड आणि उपजिल्हाधिकारी कार्यालय (वि.भू.सं.) जा.प्र., बीड येथील कर्मचारी एम.जे. शेख



आणि वि.भु.सं. अधिकारी विकास माने यांच्या विरुध्द माझी तक्रार आहे.सदरील तक्रारी मुळे आरोपी च्या विरोधात केस दाखल झाली.. आरोपीचे वकील ॲड योगेश टेकाडे यांनी केलेला युक्तिवाद ग्राह्य धरून आरोपी राम धनवडे व अंसाबाई धनवडे यांना भारतीय दंड संहिता चे कलम ४२०,४६७,४६८,४६९ या गुन्ह्यातून जामीन मंजूर करण्यात आला..

# साळींबा येथे लाडक्या कामधेनू गाईचं अनोखं डोहाळे जेवण!

### महिलांनी भरली ओटी अनगोमातेसोबत खास फोटो सेशन

**ऋणातून काही प्रमाणात उतराई होण्याचा प्रयत्न .**
शेतकरी तुकाराम जाधव, लताताई जाधव यांनी प्रतिक्रिया देताना सांगितली कि कामधेनू गायीला आम्ही उत्तम प्रकारे सांभाळले असुन. आमच्या सर्व घरादाराला तिचा चांगलाच लळा लागला आहे. आतापर्यंत तिने आम्हाला दुध भरपूर दिले. आमची गाय फारच गुणवान आहे आमच्या घरातील एक सदस्यच बनली आहे. आमच्याकडे ती आल्यापासून आमच्या घरात लक्ष्मी नांदू लागली, अशी आमची श्रद्धा आहे. भारतीय संस्कृतीमध्ये गायीला देव मानलं आहे. तिचाही सन्मान व्हावा आणि तिच्या ऋणातून काही प्रमाणात उतराई होण्यासाठी म्हणून आम्ही हा अनोखा डोहाळे जेवण सोहळा कार्यक्रम आयोजित केला होता.

वडवणी प्रतिनिधी:-
वडवणी तालुक्यातील साळिंबा येथील शेतकरी तुकाराम बंन्सीधर जाधव व लताताई तुकाराम जाधव व त्यांच्या कुटुंबीयांनी तसेच गावातील सर्व महिलांनी एकत्र येऊन हिंदू धर्मात श्रेष्ठ असणाऱ्या गोमाता म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कामधेनू गायीच्या डोहाळे पुरवित, महिलांनी भरली ओटी भरून पुजन करून गोमाते सोबत फोटो काढून अनोखे डोहाळे जेवणाचा सोहळा मारोती मंदिरा समोर काल रविवार रोजी पाडव्याच्या शुभमुहूर्ता आयोजित केला होता.

आई होणं ही महिलांच्या जीवनातील सुंदर अनुभव असतो. कुटुंबातील महिला गरोदर असेल तर संपूर्ण कुटुंबच तिचं गोड कौतुक करून मोठा खर्च करून डोहाळे जेवण सोहळा करत असतात. पण वडवणी तालुक्यातील साळींबा येथील तुकाराम जाधव व लताताई जाधव या शेतकऱ्याने आपल्या कामधेनू लाडक्या गायीचं डोहाळ जेवण सोहळा काल रविवार रोजी पाडव्याच्या शुभ मुहूर्तावर धूमधडाक्यात केला आहे. या अनोख्या डोहाळ जेवणा सोहळ्याची पंचक्रोशीत चर्चा आहे. गायीला आपण गोमाता म्हणतो त्याच गाईचे चक्क डोहाळे पुरवित डोहाळ जेवणाचा अनोखा सोहळा या शेतकरी कुटुंबाने केला. यानिमित्ताने सगळ्या गावाला त्यांनी आमंत्रित केले होते यामध्ये या सोहळ्याला गावातील सर्व महिलांनी एकत्र येऊन गायीला फुलांनी सजवून साडी,चोळीने ओटी भरून हळद कुंकू लावून पुजा करुन गोमाते सोबत फोटो काढून डोहाळे जेवण सोहळा अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
मंगळवार १ एप्रिल २०२५
https://lokaarambh.com



## महाराष्ट्र केसरी स्पर्धेत शंभूराजे संकुलाच्या मल्लांची चमकदार कामगिरी




जामखेड । प्रतिनिधी महाराष्ट्र कुस्तीगीर परिषदेच्या मान्यतेने कर्जत येथे सुरू असलेल्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेत जामखेड येथील शंभूराजे कुस्ती संकुलाचे पैलवान संदीप लटके याने ७९ किलो वजन गटाच्या मॅट विभागात सुवर्णपदक पटकावले असून त्याचप्रमाणे पैलवान बाळासाहेब चौरे,७० किलो वजन गटात माती विभागात कांस्य पदक तसेच पैलवान तुषार खामकर याने ७० किलो वजन गटात मॅट विभागात सुवर्ण पदकाचा मानकरी ठरला.या शानदार विजयाने या तिनही पैलवानांनी आपल्या संकुलाचे नाव उज्ज्वल केले आहे. संदीप लटके याला शंभूराजे कुस्ती संकुलाचे संस्थापक अध्यक्ष मंगेश आजबे आणि वस्ताद बापू जरे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या मेहनती व प्रशिक्षणामुळे संदीपने उत्कृष्ट कामगिरी करत प्रतिस्पर्ध्यांवर मात केली.

# गेवराई तहसील बनले दबंगांचा अड्डा निराधारांचा केला त्यांनी खड्डा!

गेवराई तहसील कार्यालयातील मिलीजुली कर्मचाऱ्यांकडे वरिष्ठ अधिकारी कानाडोळा करीत आहेत. या रॅकेटमुळे सर्वसामान्यांची लुबाडणूक मात्र होत आहे. कार्यालयात लाच दिल्याशिवाय कोणतेही काम होत नसल्याने सामान्यांना जीव नकोसा झाला आहे. मदतनीस नावाचे ङ्कंत्राटी वळूफ फुकट पोसले जाणारे डझनभर ङ्गगणू म्हणून मदतनीसफ कार्यालयात वावरत आहेत. त्यांच्या माध्यमातून कार्यालयातील दलालांचे रॅकेट सक्रिय आहे. आश्चर्याची बाब म्हणजे, यात पाच ते सहा महिलांचाही समावेश असल्याची चर्चा रंगत आहे. शिकार शोधून भोळ्याभाबड्या नागरिकांना अडवायचे व त्यांच्याकडून पैसे उकळायचे, असे प्रकार वाढल्याच्या तक्रारी दिवसेंदिवस वाढत आहेत. दलालांचे वतुर्ळ विस्तारत आहे. दलालांना कार्यालयातील अनेक अधिकारी व कर्मचाऱ्यांचाङ्कआशीर्वादफ लाभतोय. प्रशासन स्तरावर रखडलेले काम करून देतो, असे आमिष त्यांना दाखविले जाते. रेशन कार्ड, संजय गांधी योजनेचे काम, दाखले, परवाने नूतनीकरण, नकला, उतारे आदी कामांसंदर्भातील काम दलालांमार्फत तातडीने होत आहे. कंत्राटी कर्मचाऱ्यांना समजते केवळ पैशांची भाषा, कार्यालयात शासकीय नियमांची पायमल्ली केली जात आहे. एखादे काम रखडले असताना केवळ पैशांची भाषाच अधिकारी व कर्मचाऱ्यांना समजते. आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता न करताच विविध योजनांचा लाभ नागरिकांना मिळवून दिला जातो. शिधापत्रिकेसाठी दलालांना ७०० ते १००० रुपयांपर्यंत व निराधार योजनेसारख्या कामांकरिता १००० ते २००० रूपये दिले म्हणजे काम झालेच म्हणून समजा. असे चित्र पाहायला मिळते. या गणू नावाच्या कर्मचाऱ्यांनी ङ्गदबंगगिरीफ करत आहेत. एखाद्या कागदाची पूर्तता न केल्यास काही कर्मचारी तर चक्क ङ्गदबंगगिरीफ करतात. प्रकरणाची कागदपत्रे ते हवेत भिरकावून त्रागा करतात. अखेर कंटाळून नागरिकांना दलालांच्या मार्गाने जायला ते भाग पाडतात. योग्यरित्या माहिती दिली जात नाही. दलालालांमार्फत हे काम केल्यास काही वेळातच कागदपत्रं हाती पडतात. लाचेच्या हिस्सेवाटणीवरून नुकतीच कर्मचाऱ्यांमध्ये शाब्दीक बाचाबाचीही झाली. देखील हे प्रकरण घडले असल्याचीही चर्चा आहे. शासकीय कामकाजात हस्तक्षेप, नागरिकांना आमिष दाखवून त्यांची आर्थिक लूट करणे हा कायद्याने गुन्हाच आहे.

## उमरा येथे गुढीपाडवा व रमजान-ईद उत्साहात साजरी





नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट नांदेड-लोहा : ३०-मार्च रोजी हिंदू नववर्षाच्या निमित्ताने उमरा येथे आपापल्या घरावर गुढ्या उभारून गुढीपाडव्याचा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.तसेच ३१-मार्च रोजी पवित्र रमजान-ईद निमित्त सकाळी ७ वाजता सर्व मुस्लिम बांधवांनी नमाज पठण करून ईद-सण उत्साहात साजरा केला. महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे आणि याच संतांच्या भूमीत उमरा नगरीमध्ये सर्वधर्म बंधुभाव जोपासत दोन्ही समाज बांधवांनी एकमेकांना शुभेच्छा देत हिंदू नववर्ष गुढीपाडवा व पवित्र रमजान-ईद हा सण-उत्सव मोठ्या भक्ती भावात अगदी उत्साही आनंदी वातावरणात उमरा गावकऱ्यांनी साजरा केला.

# भावाच्या आत्महत्या प्रकरणी गुन्हा दाखल असलेल्या स्वप्निल (उर्फ) बबलू देशमुखाचा दगडाने ठेचून खून

सिरसाळा । प्रतिनिधी काल सणासुदीच्या वेळी सिरसाळा पासून काही अंतरावर असलेल्या कानपूर मध्ये संध्याकाळी पाचच्या सुमारास घटना घडली. धारूर तालुक्यातील काना पूर येथे शनिवारी सायंकाळच्या सुमारास एक या हृदयवद्रक घटनेत स्वप्निल (उर्फ) बबलू देशमुख (वय अंदाजे २७) यांची निगुर्ण हत्या करण्यात आली. त्यांना अज्ञात हल्लेखोरांनी दगडाने ठेचून मारले. धक्कादायक बाब म्हणजे. दोन वर्षांपूर्वी पहा याच स्वप्निलच्या मानसिक त्रासाला कंटाळून गावातील किराणा दुकानदार यांचा अविनाश देशमुख यांनी २३ मार्च २०२३ रोजी आत्महत्या केली. याप्रकरणी स्वप्निल देशमुख वर गुन्हा दाखल होता आणि याच गुन्ह्यावरून गावात तणावाचे वातावरण होते. या हल्ल्यात आत्महत्या केलेल्या अविनाश चा भाऊ संतोष देशमुख आणि त्याची पत्नी सोनाली देशमुख हे देखील गंभीर जखमी झाले असून त्यांच्या शरीरावर तीक्ष्ण हत्याराने वार करण्यात आले आहेत. विशेष म्हणजे. अविनाश देशमुख यांनी ज्या लिंबाच्या झाडाखाली आत्महत्या केली होती. त्याच झाडाखाली त्यात स्वप्नील देशमुख ची हत्या झाल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. शनिवारी संध्याकाळी पाच वाजेच्या सुमाराची खळबळजण घटना घडली. दोन वर्षांपूर्वीची दाखल असलेल्या गुन्ह्यामुळे गावात आधीच कटुता होती. मिळालेल्या माहितीनुसार. संतोष देशमुख यांच्यावर स्वप्निल उर्फ बबलू देशमुख वारंवार गुन्हा मागे घेण्यासाठी दबाव टाकत होते. याच पार्श्वभूमीवर ही घटना झाली असावी, असा संशय व्यक्त केला जात आहे. स्वप्निल चा दगडाने हल्ला चढवला. ज्या त्यांच्या जागीच मृत्यू झाला. या झटापटी संतोष देशमुख आणि त्यांची पत्नी सोनाली देशमुख हे देखील गंभीर जखमी झाले. त्यांच्या शरीरावर गुप्ती सारखा धारदार हत्याराने वार असल्याचे प्रत्येकदर्शनी सांगितले. घटनास्थळावरून ती गुप्ती बरामत करण्यात आली असल्याची माहिती मिळत आहे. या घटनेनंतर गावात एकच आक्रोश पायाला मिळाला. संपत ग्रामस्थांनी घटनास्थळी मोठी गर्दी केली होती. दरम्यान. नंतर संतोष देशमुख आणि त्यांची पत्नी सोनाली देशमुख स्वतःहून सिरसाळा पोलीस स्टेशन येथे हजर झाले. सोनाली देशमुख यांनी मयत स्वप्निल देशमुख यांच्या विरोधात पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. ज्या लिंबाच्या झाडाखाली अविनाश देशमुख यांनी गळफास घेतला होता. त्याच ठिकाणी स्वप्निल ची हत्या झाल्याने गावकऱ्यांमध्ये भेटीचे आणि आश्चर्य यांचे मिश्रण पाहायला मिळत आहे. या घटनेमुळे संपूर्ण कान्नापूर सुन्न झाले असून. दोन वर्ष पूर्वीच्या आत्महत्येच्या घटनेची आणि आत्ताच्या खुनाची चर्चा प्रत्येक घरात सुरू आहे. पोलिसांनी तातडीने घटनास्थळी थांब घेऊन पंचनामा केला असून तपास सुरू केला आहे.





बीड तेजस अर्बन को-ऑपरेटिव क्रेडिट सोसायटी लिमिटेड बीड च्या वतीने आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष २०२५ निमित्ताने आज पाणपोई व बाकडे वाटप उद्घाटन सहकार अधिकारी श्री सांगुळे एस एस व दैनिक प्रजापत्राचे संपादक श्री संजय मालानी सर यांच्या हस्ते करण्यात आले . यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष ॲड प्रकाश दादा कवठेकर, सचिव रामदास ठोसर सर, पोलीस अधिकारी श्री पवार, संस्थेचे अधिकारी सचिन घिगे,अविनाश मोरे , व्यापारी श्री शेख इकबाल शेख करीम सह आदी उपस्थित होते.

## विद्यार्थी जीवनात असताना अभ्यास केल्यास उत्तुंग यश प्राप्त होते -डॉ.अजय धोंड

आष्टी । प्रतिनिधी आष्टी येथील आनंद चॅरिटेबल संस्था संचलित कॉलेज ऑफ फार्मासुटिकल सायन्स अँड रिसर्च आष्टी(डी , बी अँड एम फार्मसी )या फार्मसी कॉलेजमध्ये नुकतेच रिदम (ताल ) फार्मा फेस्टिवल २०२५ संपन्न झाले, रविवार दिनांक २३ मार्च २०२५ स्नेहसंमेलन व बक्षीस वितरण ,सांस्कृतिक कार्यक्रम या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. अजय दादा धोंडे सहसचिव आनंद चॅरिटेबल संस्था आष्टी व प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. डी बी राऊत प्रशासन अधिकारी आनंद चॅरिटेबल संस्था आष्टी व डॉ. चंद्रकांत गोसावी प्राचार्य महेश आयुर्वेद महाविद्यालय आष्टी हे होते. अध्यक्षीय भाषणात डॉ. अजयदादा धोंडे यांनी सांगितले की विद्यार्थ्यांनी कॉलेजमध्ये असताना विद्यार्थ्यांनी घेतलेल्या प्रवेश संदर्भातील शाखेमधील प्रत्येक विषयाचा अभ्यास व्यवस्थित केला पाहिजे व्यवस्थित अभ्यास केला तर पुढे येणाऱ्या प्रत्येक परीक्षेमध्ये विद्यार्थी चांगले यश संपादन करू कॉलेजमध्ये लावली होती सर्व विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या पदार्थाचा आस्वाद घेतला. रविवारी दिनांक २३ मार्च रोजी स्नेहसंमेलन व बक्षीस वितरण, सांस्कृतिक कार्यक्रम झाला. ४ यामध्ये विद्यार्थ्यांनी नाटक, डान्स, गाणे समूहगीत ,समूह डान्स असे वेगवेगळे प्रकारचे सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. तसेच यावर्षी क्लास ऑफ द इयर २०२५ ची ट्रॉफी डी फार्मसी मध्ये द्वितीय वर्ष डी फार्मसी व बी फार्मसी मध्ये तृतीय वर्ष बी फार्मसी या क्लासने ट्रॉफी जिंकली या सर्व कार्यक्रमाचे आयोजन नोकरी मिळते त्यामुळे विद्यार्थ्यांनी विद्यार्थी जीवनामध्ये असताना अभ्यास करावा व आपल्या आई-वडिलांचे स्वप्न पूर्ण करावे , अभ्यासाव्यतिरिक्त कॉलेजमध्ये होत असलेले वेगवेगळे कार्यक्रम यामधून विद्यार्थ्यांना आपले कला गुण दाखवता येतात व या कलागुणामुळे शकतो, विद्यार्थी औषध निर्माण कंपनी मधील मुलाखती असो किंवा इतर फार्मसी संदर्भातील परीक्षामध्ये यश संपादन करू शकतो विद्यार्थ्याला यश मिळते , चांगल्या प्रकारची विद्यार्थी समाजामध्ये चांगले स्थान प्राप्त करतो व त्याच कलागुणांचा विद्यार्थ्यांना जीवनामध्ये खूप फायदाही होतो त्यामुळे कॉलेज जीवनामध्ये अशा वेगवेगळ्या सांस्कृतिक कार्यक्रम, स्पोर्ट, वेगळे स्पर्धा परीक्षामध्ये विद्यार्थ्यांनी भाग घेतला पाहिजे असे डॉ. अजयदादा धोंडे यांनी सांगितले. या फार्मसी कॉलेजमध्ये गेल्या चार दिवस वेगवेगळ्या प्रकारचे कार्यक्रम सादर करण्यात आले पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांनी सर्व वेगवेगळ्या कलाकारांची वेशभूषा परिधान केली होती, दुसऱ्या दिवशी आपल्या संस्कृतीला धरून असलेले वेगवेगळ्या राज्यामधील पारंपारिक वेशभूषा त्यानुसार वेशभूषा परिधान केली होती . या दरम्यान विद्यार्थ्यांचा वेगवेगळे खेळाच्या स्पर्धा घेण्यात आल्या, विद्यार्थ्यांनी या ठिकाणी स्वतः खाण्याचे पदार्थ तयार करून वेगवेगळे खाण्याचे पदार्थांचे दुकाने(स्टॉल) कॉलेजमधील सर्व प्राध्यापक व इतर सहकर्मचारी यांनी केले होते

## शिवाजीनगर पोलीसांची कुंटणखाना चालवणाऱ्या दोघांवर कारवाई

बीड । प्रतिनिधी यशंवतराव चव्हाण नाट्यगृहा जवळील पत्र्याच्या शेडच्या रुममध्ये दोन इसम वेश्या व्यवसाय चालवत असल्याची गोपनीय बातमी पोलीस निरीक्षक मारोती खेडकर यांना मिळाल्यावरुन त्यांनी सदरची माहीती उपविभागीय पोलीस अधिकारी विश्वंभर गोल्डे यांना दिली असता त्यांनी दिलेल्या आदेशानुसार पोलीस निरीक्षक मारुती खेडकर व पोलीस स्टेशन शिवाजीनगर येथील पथकानेछापा मारुन वेश्या व्यवसाय चालवणारे दोघांना ताब्यात घेतले त्यांना न्यायालयात हजर केले असता दोघांना २ एप्रिल पर्यंत कोठडी देण्यात आली. आरोपी विशाल सुनिल वाघमारे वय २९ वर्षे, रा. अशोक नगर, बार्शी नाका, बीड, शेख अख्तर ऊर्फ सलीम शेख महेमुद वय ४६ वर्षे, रा. इंदीरा नगर, नाटयगृहा जवळ, बीड यांना जागीच पकडून छत्रपती संभाजीनगर येथील ०२ पिडीत महीलांची सुटका केली असुन आरोपी यांना अटक करुन आज रोजी न्यायालयात हजर केले असता त्यांना दिनांक ०२/०४/२०२५ रोजी पावेतो पोलीस कस्टडी रिमांड देण्यात आलेली आहे,सदरची कारवाई पोलीस अधिक्षक नवनीत काँवत अपर पोलीस अधिक्षक सचिन पांडकर यांचे मार्गदर्शनाखाली उपविपोअ विश्वंबर गोल्डे यांचे आदेशानुसार पोलीस निरीक्षक मारुती खेडकर, सहा. पोलीस निरीक्षक विलास मोरे, महीला पोलीस उपनिरीक्षक श्रीमती निता दामधर, पोलीस हवालदार गणेश परजने, पोलीस शिपाई भरत शेळके, महीला पोलीस शिपाई विशाखा वडमारे यांनी केली आहे



परळी वै.। प्रतिनिधी तालुक्यातील मौजे कन्हेरवाडी गावाने शाश्वत विकासाच्या दृष्टीने एक पाऊल पुढे टाकले आहे. मराठी नववर्ष आणि गुढी पाडव्याच्या शुभमुहूर्तावर गावासाठी नवीन पाणीपुरवठा योजनेचे लोकार्पण करण्यात आले. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड तसेच गावातील ज्येष्ठ नेते श्रीराम मुंडे यांच्या उपस्थितीत श्रीफळ वाढवून या योजनेचा शुभारंभ करण्यात आला. ग्रामस्थांच्या उपस्थित हा लोकार्पण सोहळा मोठ्या थाटात संपन्न झाला. गावातील नागरिकांसाठी याचा मोठा फायदा होणार असून या योजनेमुळे नागरिकांना मुबलक प्रमाणात शुद्ध पाणी निःशुल्क स्वरूपात मिळणार आहे.

## डॉ.सचिन मिरासे बनला दिग्रस गावातील पहिला एमबीबीएस डॉक्टर

# जिद्द आणि चिकाटीने परिस्थितीवर मात, एमबीबीएस बनलेल्या सचिनची यशोगाथा

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट नांदेड-किनवट : किनवट सारख्या अतिदुर्गम आदिवासी पाड्यातील दिग्रस येथील शेतमजुरांचा मुलगा गावातील पहिला डॉक्टर बनला गरीब कुटुंबात जन्म, आई वडील शेतमजूर अशा परिस्थितीतही मेहनत, जिद्द आणि चिकाटीनं सर्वावर मात करत सचिनन स्वतःला सिद्ध केलं. दिग्रस येथील या छोट्याशा गावातील आदिवासी समाजातील सामान्य कुटुंबात वाढलेल्या तरुणानं डॉक्टर बनत (एमबीबीएस) ची पदवी मिळवत मोठं यश मिळवलंय अनुसया व श्रावण मिराशे यांचा मुलगा डॉ.सचिन मिरासे यानं हा लौकिक मिळवला.आई वडील शेतमजूर अशा परिस्थितीतही मेहनत, जिद्द आणि चिकाटीनं सर्वावर मात करत सचिनन स्वतःला सिद्ध केलं.ध्यास, धडपड, सातत्य, प्रामाणिकपणा, कौशल्य, बुद्धिमत्ता, कठोर मेहनत, जिद्द आणि प्रचंड इच्छाशक्ती यांच्या जोरावर माणूस यशाच्या शिखरावर विराजमान होतो.सर्वसामान्य एका आदिवासी समाजातील मुलानं हे करून दाखवलं आहे.या मुलाचं नाव आहे डॉ. सचिन अनुसया श्रावण मिरासे नांदेड जिल्ह्यातील किनवट तालुक्यातील दिग्रस या खेड्यातून येत तो डॉक्टर बनला. सचिनच पहिली ते सातवी पर्यंतच



प्राथमिक शिक्षण गावात जिल्हा परिषद शाळेत माध्यमिक दहावी पर्यंतच शिक्षण छत्रपती शिवाजी महाराज हायस्कूल बेल्लोरी धानोरा येथे अकरावी बारावी सरस्वती विद्यामंदिर किनवट येथे तर वैद्यकीय नीट परीक्षा नांदेड येथून पूर्ण केली एमबीबीएस वैद्यकीय शिक्षण मायमर मेडिकल कॉलेज पुणे इथं झालं. एका सर्वसामान्य कुटुंबातील मुलानं जिद्द व परिश्रमाने एमबीबीएस ची पदवी घेत प्रथम श्रेणीत परीक्षा उत्तीर्ण होऊन डॉक्टर होण्याचा मान मिळवला आहे. सचिनने एमबीबीएस ही पदवी संपादन केली.अगदी जिद्दीनं परिश्रमानं कष्टाने सामान्य परिस्थितीतून जात त्यानं शिक्षण पूर्ण केलं. पहिल्याच प्रयत्नात तो उत्तीर्णही झाला. आई-वडिलांचं स्वप्न साकार करत गावातला पहिला एमबीबीएस डॉक्टर होण्याचा मान त्यानं मिळवला. सचिनन यशाचं श्रेय आई-वडील दिग्रस येथील सामाजिक कार्यकर्ते बाळू पाटील पवार कुटुंबीयांसह गुरुजनांना दिलं आहे.तसेच दिग्रस ग्रामस्थांचे व आदिवासी समाजातील मदत केलेल्या दानशूर व्यक्तींचेही त्याने आभार मानले आहेत.तर ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी खचून न जाता स्पर्धा परीक्षांमध्ये हिमतीनं पुढं जावं असं आवाहन त्यानं युवकांना केलं आहे.

# अजित पवार यांच्या उपस्थितीत होणाऱ्या युवा संवाद मेळाव्याला उपस्थित रहा

## राष्ट्रवादीचे जेष्ठ नेते बबनराव गवते यांचे आवाहन

बीड: राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष बांधणी आणि संघटन वाढविण्याचे काम सुरू असून दि.२ एप्रील रोजी बीडमध्ये राष्ट्रवादीचे जेष्ठ नेते मा.आ.अमरसिहं पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत बीडमध्ये युवा संवाद मेळाव्याचे आयोजन केले आहे. या मेळाव्यास बीड मतदार संघांतील राष्ट्रवादीच्या सर्व आजी-माजी पदाधिकारी, लोकप्रतिनिधी युवा कार्यकर्त्यांनी उपस्थित रहावे, असे अवाहन राष्ट्रवादीचे जेष्ठ नेते बबनराव गवते पाटील यांनी केले आहे. येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात हा युवा संवाद मेळावा होत आहे. सकाळी ९ वाजता उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत मेळाव्याला सुरुवात होईल. कार्यक्रमास आ.धनंजय मुंडे, आ.प्रकाश सोळंके, आ.विजयराजे पंडित,



राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवक प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण, माजी आ.बाळासाहेब आजबे, राष्ट्रवादी ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष कल्याण आखाडे हे उपस्थित राहणार आहेत. विधानसभा निवडणूकीनंतर बीड मतदारसंघात पक्षसंघटन आणि बांधणीचे काम हाती घेण्यात आलेले आहे. बीड येथे होत असलेल्या कार्यक्रमाचे आयोजन बळीराम गवते यांनी केले असून राष्ट्रवादीचे जेष्ठ नेते मा.आ.अमरसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली हा युवा संवाद मेळावा होत आहे. ते स्वत मेळाव्याच्या तयारीवर संपूर्ण लक्ष ठेवून आहेत. स्पष्टवक्ते म्हणून उपमुख्यमंत्री अजित पवार यांची ओळख असून त्यांचे मार्गदर्शन घेण्यासाठी कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत. दि.२ एप्रील रोजी उपमुख्यमंत्री अजित पवार हे सकाळी ८ वाजता बीडमध्ये दाखल होणार आहेत. त्यानंतर ते पक्ष कार्यालयात कार्यकर्त्यांशी संवाद साधणार आहेत. यानंतर यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात युवकांशी संवाद साधणार आहेत. युवक मेळाव्यास जिल्ह्यातील डॉ.योगेश क्षीरसागर,



प्रज्ञा खोसरे, अविनाश नाईकवाडे, फारूक पटेल, अमर नाईकवाडे, महादेव उबाळे, बप्पासाहेब घुगे, बाळासाहेब गुजर, नंदकुमार कुटे, अजिंक्य अनेराव यांची उपस्थित राहणार आहेत. या मेळाव्यास सर्व युवक कार्यकर्ते यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे अवाहन जेष्ठ नेते बबनराव गवते यांनी केले आहे.

## पैशांचा पाऊस पाडून दाम दुप्पट करुन देतो म्हणून बीडच्या चार जणांना बारा लाखाला फसवल

पैशाचा पाऊस पाडून येतो म्हणून दाम दुप्पट करून देण्याचे अमिष दाखवून पैशांचा पाऊस पाडणाऱ्याने रसान हातात देता भुत दाखवून जादूटोना करीत १२ लाखाची फसवणुक केल्याची तक्रार बीड येथील चौघांनी तालुका जालना पोलीस ठाण्यात केली आहे. पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीत बीड येथील बदामराव कितनगराव नलवडे , भागवत रावत्ताव्हेब देवडे , अमोल राजेभाऊ भोसले , संदीप सुनील भोसले यांनी म्हटले आहे की, आनया रोतीषा व्यवसाय असून, आम्हाला जालना शहराजवळील इंदेवाडी येथील सिध्दार्थ नगरातील रतन आत्माराम जांगडे हा त्याच्या घरी पैशांचा पाऊस पाडून पैसे दुप्पट करून देत असल्याची माहिती मिळाली होती. त्यामुळे आम्ही २८ ऑक्टोबर २०२४ रोजी रतन लांडगे याच्या परी गेलो आणि त्याच्याशी संपर्क साधला असता त्याने ११ लाख ७० हजार रुपये रोख आणि ३० हजार कोन-पेच्दारे आमच्याकडून घेतले. इतकेच नव्हे तर त्याने पैशांचा पाऊस पाडून ते पैसे आमच्यासमोर एका गोणीत भरून ठेवले. ही गोणी आम्ही घेवून निघण्याषा प्रयत्न केला असता त्याने जादूटोना करून आमच्यासमोर भूत उभे केले. त्यामुळे आम्हाला पैशाची गोणी घेवुन तेथून निघता आले नाही. त्यानंतर तो पुन्हा आम्हाला आढळून आला नाही. त्यामुळे अंधश्रध्दा दाखवुन रतन लांडगे याने आमची १२ लाखाची फसवणूक केल्याप्रकरणी तक्रार देण्यात आली. तक्रार उशिरा केल्याने शहानिशा करावी लागणार अशी माहिती पोलीस निरीक्षक सुरेश उनवणे यांनी दिली. सिध्दार्थनगर येथील रतन लांडगे याने पैशांचा पाऊस पाडून भुत दाखवित १२ लाखाला फसविल्याप्रकरणी खरा प्रकार काय आहे चौकशी केल्यानंतर लक्षात येईल. मात्र, हा विषय तांत्रीक असल्याने शहानिशा केल्यानंतरच याप्रकरणी गुन्हा दाखल केला जाईल, असे पोलीस निरीक्षक सुरेश उनवणे यांनी सांगितले. या तक्रारीतील पैशाचा पाऊस आणि भूत दाखविणे हा प्रकार थोडा संशयात टाकणारा असल्यामुळेच सध्यातरी गुन्हा दाखल नसल्याचे सांगुन प्रत्यक्ष तक्रारदाराशी समक्ष भेटुन चौकशी केल्यानंतर नेमकी माहिती मिळेल आणि त्यानंतरच कारवाई केली जाईल, असे श्री. उनवणे यांनी स्पष्ट केले. तसेच या प्रकरणी सखोल चौकशी केल्यानंतर फसवणूक झाली का नाही ते समोर येईल.

## बळीराजाचे आर्थिक जीवन भाजपच्या केंद्र व राज्यातील सरकारने उध्वस्त केले-वसंत मुंडे

परळी । प्रतिनिधी केंद्रात व राज्यात आरएसएसच्या विचारधारेचे भारतीय जनता पार्टीचे सरकार सत्तेवर असून संपूर्णपणे शेतीमालाचे भाव हमीभावा पेक्षा कमी करून शेतकऱ्याला आर्थिक कोंडीत टाकून बळीराजाचे स्वप्न उत्पन्न दुप्पट करण्याचे देखावा करून शेतकरी आर्थिक संकटात अडकविण्याचा गंभीर आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्र ेस कमिटी ओबीसी विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष वसंत यांनी केला. आपल्या देशामध्ये खरीप रब्बीचे शेतातीलाचे उत्पन्न तयार झाले की परदेशातून सर्व प्रकारचा शेतीमाल ठराविक टक्केवारी देणाऱ्या व्यापाऱ्यामार्फत मागून घेऊन संपूर्ण देशातील शेतकऱ्याच्या शेतीमालाचे भाव पाडून शेतकऱ्याचे जीवन उध्वस्त करण्याचा आरएसएस विचारधारेच्या केंद्रात व राज्यातील सरकारचा अजिंठा आहे. शेतीमाल परदेशातून आयात करताना आर एस एस बीजेपीच्या व्यापाऱ्याकडून अमेरिका ब्राझील अर्जेंटिना चीन या देशात सोयाबीनचे उत्पन्न मोठ्या प्रमाणावर होते. भारत देशातील सोयाबीन ची मागणी व पुरवठा आणि उपभोग या घटकांमध्ये होणाऱ्या बदलाचा परिणाम सोयाबीनच्या कापूस इतर शेतीमालाच्या किंमतीवर होत असतो. सरकारच्या चुकीच्या आयात निर्यात धोरणामुळे शेतीमालाचे भाव नसल्यामुळे शेतकरी आर्थिक दृष्ट्या चिंताजनक असून संपूर्ण शेतीमालाला योग्य भाव मिळत नसल्यामुळे शेतकऱ्यापुढे आर्थिक संकट उभे राहत असल्यामुळे आत्महत्या वाढत आहेत . शेतकऱ्याच्या दैनंदिन कुटुंबाचा खर्च भागवणे अडचणीचे झाले आहे. तरीही केंद्र व राज्य सरकारला काहीही देणे घेणे नाही. एकीकडे शेतीमधील खते बी बियाणे कीटकनाशक औषधी ट्रॅक्टर खर्च खुरपणी फवारणी मळणी यंत्र मजुरी दैनंदिन खर्च वाढल्यामुळे व शेतीमालाला भाव नसल्यामुळे शेती परवडत नाही .उत्पादनातून खर्च निघणे शक्य नाही, त्यामुळे सर्व बाजूने शेतकऱ्याला शासनाने आधार देणे काळाची गरज आहे. शासनाचे बाजारपेठेवर नियंत्रण नाही. हमीभावापेक्षा कमी भावाने शेतकऱ्याचा शेतीमाल बाजारपेठेतून खरेदी केला जात आहे. शासनाकडून कोणतेही कारवाई केली जात नाही. शासनाकडून आधारभूत किंमत शेतीमालाला मिळत नाही. अतिवृष्टी दुष्काळ पिक विमा विविध योजनांचे अनुदान आज तागायत शेतकऱ्याच्या खात्यात वर्ग केलेले नाहीत. निष्क्रिय केंद्र व राज्यातील सरकार शेतकऱ्याला संपवण्याचे षडयंत्र रचित असल्याचा गंभीर आरोप काँग्रेसचे नेते वसंत मुंडे यांनी केला.

# पारंपरिक शेती ऐवजी फुलशेती करत मुळुकवाडी येथील शेतकरी चंद्रसेन ढास यांनी फुलवला समृद्धीचा मळा

बीड । प्रतिनिधी तालुक्यातील मुळुकवाडी येथील शेतकरी चंद्रसेन शेषेराव ढास या शेतकरी कुटुंबाने पारंपरिक पिकांऐवजी फुलाची शेती करत समृद्धीचा मळा फुलवला आहे. साधारणतः १००० लोकसंख्या असलेल्या मुळुकवाडी गावातील शेतकरी प्रामुख्याने कांदा पिक घेतात.संपुर्ण लिंबागणेश पंचक्रोशीत एकमेव फुलशेती करणारे शेतकरी म्हणून चंद्रसेन ढास यांची ओळख आहे.१२ वर्षांपूर्वी मुळुकवाडी येथील १० शेतकऱ्यांनी एकत्र येऊन गुलाब फुलांची गटशेती करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतर केवळ चंद्रसेन ढास यांनीच फुलशेती व्यावसाय तग धरून जिद्दीने करत आहेत सकाळी उठून कळी तोडली तरच २ दिवस ती टिकते त्यामुळे यासाठी घरचे मजुर असणे गरजेचे आहे. चंद्रसेन ढास यांना ५ एक्कर शेती असुन त्यापैकी ३ एक्कर शेतात फुलशेती करतात. फुलांना योग्य दर मिळण्यासाठी लागवड ऐन उन्हाळ्यात म्हणजे पाणी टंचाईच्या काळात करावी लागते.पावसाळा सुरू असताना उत्पादन निघण्यास सुरूवात





होत असल्याने अनेकदा कमी जास्त पावसाचा फटका फुलशेतीस बसतो मात्र अस्मानी सुलतानीचा विचार न करता जोखीम पत्करून फुलशेती करतात. फुलांना श्रावणात, गणेशोत्सवात तसेच नवरात्रोत्सवात मोठ्या प्रमाणावर मागणी असते.फुलांचे बाजारभाव स्थिर नसतात. गुलाब,गलांडा, गुलछडी,बिजली,अश्टर,झेंडु, शेवंती आद फुलांचे उत्पादन करण्यात येते. बीड,केज, पाटोदा याठिकाणी फुले विक्रीसाठी पाठवली जातात.चंद्रसेन ढास यांच्या पत्नी सविता ढास,मुलगा प्रणव ढास,अथर्व ढास फुलशेतीत मदत करतात. मोठा मुलगा प्रणव ढास यांने पुणे येथे इव्हेंट मॅनेजमेंट कोर्स केलेला आहे तर अर्थव शिक्षण घेत आहे. लिंबागणेश पंचक्रोशीतील शेतकरी फुल सेंटर प्रसिद्ध असुन धार्मिक,लग्न समारंभ, वाढदिवस विविध कार्यक्रमांसाठी आवश्यक हारांसाठी चंद्रसेन ढास यांच्याकडे मागणी असते. शेतकऱ्यांना फुलशेती मध्ये चांगले उत्पन्न मिळू लागले आहे.शेतक- यांनी योजनेचा लाभ घेऊन फुलशेती मध्ये प्रगती करावी यासाठी शासनाने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत फळबाग,वनपिके, मसाला पिके व फुलशेती आदींसाठी १ वर्ष ते ३ वर्ष अनुदान तत्वावर शासकीय योजना कार्यान्वित आहे.मात्र बीड कृषी विभागाची अनास्था यास कारणीभूत असुन दोन वेळा केलेली फाईल त्यांनी आपल्या भागात फुलशेती नसल्याने नाकारली असल्याची खंत चंद्रसेन ढास यांनी बोलून दाखवली

# जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षकांचा गुंडगिरी करणाऱ्याला दणका !

बीड। प्रतिनिधी अंबाजोगाई येथे जिवे मारण्याचा प्रयत्न करणे, दंगा करणे, गैरकायदयाची मंडळी जमा करणे, दुखापत करणे, ओळखीचा फायदा घेऊन लुटने, रस्ता आढविणे, नुकसान करणे, जिवे मारण्याच्या धमक्या देणे, शिवीगाळ करणे, अवैध शस्त्र चाळगणे, दंडाधिकाऱ्यांच्या आदेशाचे उल्लंघन करणे, दगडफेक करणे या व अशा गंभीर स्वरुपाचे एकुण ।। गुन्ह्याची नोंद पोलीस अभिलेखावर असलेल्या गु ंडावर एमपीडीए नुसार कारवाई करत त्याची हर्सूल कारागृहात रवानगी करण्यात आली. जिल्ह्यातील सार्वजनिक सुव्यवस्था अबाधित ठ ेवण्यासाठी जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यानी जिल्हयाची धुरा सांभाळल्या पासुन शर्थीचे प्रयत्न चालवले आहेत त्यांना बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी मा. श्री. अविनाश पाठक यांची खंबीर साथ लाभली आहे. बीड जिल्ह्यातील गुंडगिरीचे व गुन्हेगारीचे व वाळु माफीयांचे समुळ उच्चाटन करण्याचा उदात्त दृष्टोकोन डोळ्यासमोर ठेवून एमपीडीए कायद्या अंतर्गत बऱ्याच गुन्हेगारांबर व गुंडावर कार्यवाही करण्याचे योजिले आहे. त्या अनुषघांने पोनि पो.स्टे. अंबाजोगाई शहर यांनी दिनांक ०३.०२.२०२५ रोजी इसम नामे आर्यान नरेश मांदले वय २२ वर्षे रा. बोधीघाट, अंबाजोगाई ता. अंबाजोगाई जि.बीड याचे विरुद्ध एमपीडीए कायद्याअंतर्गत स्थानबद्ध करण्याबाबतचा प्रस्ताव पोलीस अधीक्षक बोड यांच्या मार्फतीने मा. जिल्हादंडाधिकारी साहेब बीड यांना सादर केला होता.सदर स्थानबध्द इसमाविरुध्द पो. ठा. अंबाजोगाई येथे जिवे मारण्याचा प्रयत्न करणे, दंगा करणे, गैरकायदयाची मंडळी जमा करणे, दुखापत करणे, ओळखीचा फायदा घेऊन लुटने, रस्ता आढविणे, नुकसान करणे, जिवे मारण्याच्या धमक्या देणे, शिवीगाळ करण अवैध शस्त्र चाळगणे, दंडाधिकाऱ्यांच्या आदेशाचे उल्लंघन करणे, दगडफेक करणे या व अशा गंभीर स्वरुपाचे एकुण ।। गुन्ह्याची नोंद पोलीस अभिलेखावर आहे. सदरील इसम हा गंभीर स्वरुपाचे गुन्हे करण्याच्या सवईचा असल्याने अंबाजोगाई पोलीसांची त्याचेवर बऱ्याच दिवसांपासुन करडी नजर होती तसेच सदर इसमाने आपले वर्तन सुधारावे म्हणुन यापुर्वी कलम ५६(१) मपोका प्रमाणे दि. ३१.०१.२०२३ रोजी उीझउ ११० प्रमाणे दि. १५.०६.२०२३ रोजी त्याचेवर प्रतिबंधक कारवाई करण्यात आली होती. परंतु सदर इसम हा प्रतिबंधक कारवाईस न जुमानता पुन्हा चढत्या क्रमाने गंभीर गुन्हे करण्याचे चालूच ठेवुन होता त्याची अंबाजोगाई शहरात व परीसरात प्रचंड दहशत आहे. त्यांचे विरुध्द सर्व सामान्य लोक फिर्याद अथवा साक्ष देण्यास समोर येत नाहीत. तो सर्वसामान्य लोकांना व व्यापाऱ्याना त्रास देवून दहशत निर्माण करुन गुन्हे करत होता,सदर प्रकरणात श्री. अविनाश पाठक जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी बीड यांनी दिनांक १२.०३.२०२५ रोजी सदर प्रकरणाच्या अनुषंगाने एम.पी.डी.ए. कायद्याअंतर्गत आदेश पारोत फरून बीड जिल्ह्यातील सार्वजनिक सुव्यवस्था अबाधीत राहावी हा उदात्त दृष्टीकोन डोळयासमोर ठेऊन सदर इसमास तात्काळ ताब्यात घेवून हसूल कारागृह छत्रपती संभाजीनगर येथे हजर करून स्थानबध्द करणे वाचत आदेश पारीत केले होते

## धुनकवाड येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

वडवणी। प्रतिनिधी धुनकवाड नं.१ येथे दरवर्षी प्रमाणे याही वर्षी अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात करण्यात आले असून.या सोहळ्याचा आरंभ दि.१ एप्रिल २०२५ मंगळवार रोजी तर सांगता दि.७ एप्रिल २०२५सोमवार रोजी होणार आहे. तरी नामावंत किर्तनकारांचे होणार किर्तन असुन या कार्यक्रमास मोठ्या संख्येने भाविक-भक्तांनी उपस्थित राहावे असे आवाहन ग्रामस्थांनी केले आहे. डोंगरपट्यात धुनकवाड ह्या गावची ओळख धार्मिक क्षेत्रात अग्रेसर असणारे गाव म्हणून आहे.ग्रामदैवत धुनकेश्वराच्या कृपा आशिर्वादाने व वै.ह.भ.प दत्ता महाराज पिंपळनेरकर, ह.भ.प.,वै.ह.भ.प.रघुनाथ महाराज यादव,वै. गुरुवर्य गंगाधर शास्त्री मुळे यांच्या प्रेरणेने गेल्या अनेक वर्षांपासून धुनकवाड येथे भव्य अखंड हरिनाम सप्ताह सुरू आहे.दरवर्षीप्रमाणे याही वर्षी आयोजन करण्यात आले आहे.कार्यक्रमाची रूपरेषा पहाटे४ ते६ काकडा,६ ते७ विष्णुसहस्त्रनाम व गिता सायं.५ते६ हरिपाठ, सायं,९ ते ११हरिकीर्तन व नंतर सामुदायिक जागर होईल.दि.१ एप्रिल २०२५ मंगळवार रोजी ह.भ.प.गोविंद महाराज नाईकवाडे यांचे कीर्तन,दि.२ एप्रिल बुधवार रोजी ह.भ.प.दिपक महाराज मेटे,दि.३ एप्रिल गुरुवार रोजी विनोदाचार्य ह.भ.प. उध्दव महाराज ठोंबरे,दि.४ एप्रिल शुक्रवार रोजी ह.भ.प.विठ्ठल महाराज शास्त्री,निळकंठेश्वर संस्थान,वेदांतनगर ,दि.५ एप्रिल शनिवार रोजी विनोदाचार्य ह.भ.प.शिवदास महाराज जंगले शास्त्री.दि.६ एप्रिल रविवार रोजी ह.भ.प.कृष्णा महाराज रासवे.दि.७ एप्रिल सोमवार रोजी ह.भ.प.वसंत महाराज पिंपळनेरकर यांचे दुपारी १ते ३या वेळेत सुश्राव्य वाणीतून काल्याचे किर्तन होईल व नंतर सामुदायिक महाप्रसाद होईल. तरी या अखंड हरिनाम सप्ताहास भाविक-भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन ग्रामस्थांनी केले आहे.

## पवनचक्की कंपन्यांची दांडगाई वाढली

पाटोदा । प्रतिनिधी पाटोदा तालुक्यातील मौजे भायाळा पवनचक्की कंपन्यांच्या मनमानी कारभारात वरचेवर वाढ होत असून आज पाटोदा तालुक्यातील भायाळा येथील शेतकरी शेतकऱ्यांना बोगस चेक देऊ अधिकारी फसवणूक करत आहे. तसेच बळजबरीने शेतकऱ्यांवच्या रानातून तारीवढत असताना लोकांच्या फळबागांची नुकसान करत आहे तसेच गायगोट्याच्यावरुन मोठी रेणू पावरची तार वढली जात आहे.यामध्ये शेतकरी विचारणास गेल्यास गावगुंडाना हाताशी धरून शेतकऱ्यांना दाबले जात आहे. यामुळे शेतकऱ्यांमध्ये दहशतीचे सावट पसरले आहे. शेतकरी वर्ग पोलिस प्रशासनासमोर व महसूल एसडीएम यांच्या कडे तक्रार केली तर प्रशासन आंग झटकून मोकळे होत आहे. सर्वसामान्य शेतकऱ्यांना किती अडचणीचा सामना करावा लागत असेल असा प्रश्न सामाजिक जिल्ह्यधिकारी आणि पोलिस अधीक्षक बीड यांनी शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याची आवश्यकता असल्याचे म्हटले आहे. शेतकऱ्यांनी सांगितले आहे.या बाबत बोलताना आ.विजयसिंह पंडित म्हणाले की, जायकवाडी धरणाच्या पैठण उजव्या कालव्यातून पाण्याचे आवर्तन सुरु आहे. दि.५ एप्रिलपर्यंत हे आवर्तन सुरु राहणार असून पुन्हा दि.२५ एप्रिल पासून दुसरे व त्यानंतर आणखी एक आवर्तन मिळणार आहे.

# एकोप्याचा संदेश देत राजयोग फाऊंडेशन कडुन २०० कुटुंबांना शिरखुर्मा किट वाटप

बीड । प्रतिनिधी मुस्लिम बांधवांचा सर्वात महत्त्वाचा सण म्हणजे रमजान ईद. रमजान ईद च्या पार्श्वभूमीवर गरजु कुटूंबांची ईद अधिक गोड करण्याचा प्रयत्न म्हणून राजयोग फाऊंडेशन च्या माध्यमातून २०० कुटुंबांना शिरखुर्मा साहित्याचे किट उपलब्ध करुन देण्यात आले. गत ८ वर्षांपासून राजयोग फाऊंडेशन च्या माध्यमातून दिवाळी फराळ वाटपासह ५ वर्षांपासून ईद निमित्त शिरखुर्मा साहित्य वाटपाचा हा हिंदु मुस्लिम




एकोपा वाढवणारा उपक्रम अविरत सुरु आहे. यानिमित्ताने बीड शहरातील विविध भागात या किटचे वाटप करण्यात आले. यावेळी राजयोग फाऊंडेशन चे अध्यक्ष तथा नगरसेवक शुभम धुत यांच्यासह मुश्ताक अंसारी, शेख वकील, शुभम कातांगळे, डॉ.वैभव कोठेकर, सागर वाहुळ, इकबाल भाऊ, काशिफ चाऊस, सय्यद अरबाज, सत्यनारायण करवा, अशोक करवा, राजदीप धुत, आतिश अंधारे, शुभम वीर, संकेत करवा, नितिन तिपाले, सय्यद ताहेर व राजयोग फाऊंडेशन चे इतर सदस्य उपस्थित होते.

# काहीतरी खिचडी शिजत आहे जेलमध्ये कोणाच्या जीवाच्या धोका? महादेव गित्तेच्या पत्नीचा मोठा दावा

आरोपी वाल्मिक कराड आणि सुदर्शन घुले यांना आज बीडच्या जिह्ला कारागृहात मारहाण झाल्याची माहिती समोर आली होती. महादेव गिते आणि अक्षय आठवले यांनी मारहाण केल्याचं बोललं जात आहे. मात्र तुरुंग प्रशासनाकडून असं काही घडलं नसल्याचं सांगण्यात आलं आहे. तर दुसरीकडे आम्हालाच वाल्मिक कराडच्या सांगण्यावरून मारहाण करण्यात आल्याचा आरोप महादेव गित्तेनं केला आहे. दरम्यान त्यानंतर महादेव गित्ते याची रवानगी छत्रपती



संभाजीनगर येथील हर्सूल कारागृहात करण्यात आली आहे. आता या प्रकरणावर महादेव गितीची पत्नी मीरा गीते यांनी प्रतिक्रिया दिली आहे. संतोष भैया देशमुख यांच्या मारेकऱ्यांनी मारहाण केली आणि परळीचे जे आत्ताचे आरोपी आहेत, त्यांनीही मारहाण केली, मारहाण करून माझ्या पतीला साधं रुग्णालयात उपचारासाठी देखील दाखल केलं नाही. जेवढं फास्ट माझ्या पतीला हार्सुल कारागृहात हलवलं, तेवढेच फास्ट मला पुरावे द्या. बीड जेलमधून त्यांना हर्सुल जेलमध्ये नेत असताना त्यांच्यासोबत बोलणं झालं, त्यात त्यांनी सांगितले मला वाल्मिकच्या लोकांनी येऊन मारले, माझ्यावर अन्याय झाला आहे. माझ्या बॅरेक जवळ येऊन या लोकांनी मला मारहाण केल्याचं त्यांनी सांगितलं, या प्रकरणात अक्षय आठवलेचं देखील नाव घेतलं गेलं, मग त्यांना हर्सूलमध्ये का नेण्यात आलं नाही. काहीतरी खिचडी शिजत आहे असा माझा आरोप आहे, हिंडकर आणि अक्षय आठवले यांच्या जीवितास जेलमध्ये धोका आहे, असा दावा देखील मीरा गिते यांनी केला आहे.

## नेमकं काय म्हणाल्या मीरा गिते?

एवढ्या लवकर सगळ्या गोष्टी झाल्या कशा हा माझा सवाल आहे, मारहाण झाली असेल तर त्याचे सीसीटीव्ही पुरावे असतील, ते समोर आणा. त्यात कोण कोणाला मारले हे पाहा. स्वतः कारागृह अधीक्षक म्हणत आहेत वाल्मीक कराड आणि घुले यांना मारहाण झाली नाही. महादेव गीते यांना दहा लोक येऊन मारतात, गँग वगैरे आहे, सगळी वाल्मिक कराडची पद्धत आहे. चार जणांची कुठे टोळी असते का? असं मीरा गिते यांनी म्हटलं.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com